आंततात्काळ

क्र.पोमस/१/१०/३/पदोन्नती(२६-२०१७)/२०१७.
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- २३/०६/२०१७.

**संदर्भ :-** शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक रापोसे-०८१६/प्र.क्र.१४६/पोल-१(अ), दिनांक २३/०६/२०१७. **(प्रत संलग्न केली आहे).**

**विषय :-** **निवडसूची सन २०१६-१७**
**समादेशक / सशस्त्र पोलीस अधीक्षक, राज्य राखीव पोलीस बल या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना.**

*****

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, समादेशक / सशस्त्र पोलीस अधीक्षक, राज्य राखीव पोलीस बल या संवर्गातील पदांवर खालीलप्रमाणे नमूद अधिका-यांना संदर्भाधिन शासन आदेशांन्वये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | सध्याच्या नेमणुकीचे ठिकाण | पदोन्नतीने पदस्थापना |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुरेश गोपीचंद माटे | सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.४, नागपूर | समादेशक, भारतीय राखीव बटालीयन, गट क्र.१४, औरंगाबाद (श्री. निसार तांबोळी यांच्या जागी) |
| २. | श्री. श्रीधर गोपाळराव खंदारे | सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ४, नागपूर | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, नागपूर (रिक्त पदी) |

२. श्री. निसार तांबोळी, भापोसे यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येत आहेत.

३. घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, उपरोक्त अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबित / प्रस्तावित आहे, अशा अधिकाऱ्यांविरुध्द सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०२/०४/१९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदींनुसार त्यांच्याविरुध्द प्रलंबित / प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती त्यांना शिक्षा झाल्यास, सदर शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

४. सदरच्या पदोन्नतीवरील नेमणुका ह्या मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठापुढील दाखल याचिका क्र.२७९७/२०१५, मधील अंतिम निर्णयाच्या, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

५. पदोन्नतीवर पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, अथवा अन्य न्यायालयांचे स्थगिती आदेश असल्यास ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यांना पदोन्नतीवर पदस्थापना देण्यात यावी.

६. **घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,**

**(अ)** उपरोक्त अधिकाऱ्यांना उक्त अटी व शर्ती ते पूर्ण करीत असल्याची खातरजमा करुनच सध्याच्या पदावरून तातडीने कार्यमुक्त करून त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदांवर रूजू होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

**(आ)** पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्यांच्या "पदभार हस्तांतरण" प्रमाणपत्रांच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

२/-

(इ) वित्त विभागाच्या दि.०६/११/१९८४ च्या निर्णयानुसार पदोन्नत पदावर वेतननिश्चिती करण्याकरिता, कनिष्ठ पदावर देय वार्षिक वेतन वाढीनंतर पदोन्नतीच्या पदावर वेतननिश्चित करण्याबाबत विकल्प देण्याची तरतूद आहे. तरी,

**(१)** खालील नमूद संबंधीत घटक पोलीस प्रमुखांना विनंती आहे की, पदोन्नतीच्या पदावर वेतननिश्चितीकरिता उपरोक्त शासन निर्णयातील सदरहू तरतुदी वरील पदोन्नत अधिका-यांच्या निदर्शनास लेखी स्वरुपात आणून द्याव्यात, व

**(२)** अशा प्रकारचा विकल्प त्यांना द्यावयाचा असल्यास तो लेखी स्वरुपात कार्यभार स्विकारलेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आंत द्यावा, ही बाब देखील त्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

७. **पोलीस महासंचालकांनी पदोन्नत अधिका-यांचे अभिनंदन करुन, त्यांना शुभेच्छा कळविल्या आहेत.**

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथकें, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, नागपूर
समादेशक, भारतीय राखीव बटालीयन, गट क्र.१४, औरंगाबाद

श्री. सुरेश गोपीचंद माटे, सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.४, नागपूर
श्री. श्रीधर गोपाळराव खंदारे, सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ४, नागपूर
श्री. निसार तांबोळी, समादेशक, भारतीय राखीव बटालीयन, गट क्र.१४, औरंगाबाद

**प्रत सस्नेह सादर :-**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ३२.
**( लक्षवेध :- श्री. कैलास गायकवाड, उप सचिव )**

**प्रत माहितीकरिता :-**

अपर पोलीस महासंचालक (का.व.सु.), म.रा., मुंबई

प्रत :-

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर / औरंगाबाद
कार्यासन अधिकारी, का.क्र. १-अ / १६ / ३९
स्ट्रॅटेजी सपोर्ट सिस्टिम कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई

निवडसूची सन २०१६-१७.
समादेशक / सशस्त्र पोलीस अधीक्षक,
राज्य राखीव पोलीस बल या संवर्गातील
पदावर पदोन्नतीने पदस्थापना....

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

शासन आदेश क्र.रापोसे-०८१६/प्र.क्र.१४६/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :-२३ जून, २०१७.

वाचा :- पोलीस आस्थापना मंडळ क्र.१ यांनी चक्रीय पध्दतीने केलेली शिफारस.

शासन आदेश :-

समादेशक/सशस्त्र पोलीस अधीक्षक, राज्य राखीव पोलीस बल या संवर्गातील पदांवर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१६-१७ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या सहायक समादेशक/सशस्त्र पोलीस उप अधीक्षक, राज्य राखीव पोलीस बल संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना समादेशक/सशस्त्र पोलीस अधीक्षक, राज्य राखीव पोलीस बल या संवर्गातील (वेतनश्रेणी- रु. १५,६००-३९,१००/+ग्रेड पे ६,६००) पदांवर पदोन्नती देण्यात येत आहे. "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २८.४.२०१५ आणि दि. १६.७.२०१५ रोजीच्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार या अधिकाऱ्यांना महसुली विभागीय संवर्गाचे वाटप करुन, त्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. सुरेश गोपीचंद माटे | सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ४, नागपूर | समादेशक, भारतीय राखीव बटालीयन, गट क्र. १४, औरंगाबाद (श्री. निसार तांबोळी यांच्या जागी) |
| २ | श्री.श्रीधर गोपाळराव खंदारे | सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ४, नागपूर | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, नागपूर (रिक्त पदी) |

२. श्री. निसार तांबोळी, भापोसे यांच्या पदस्थापनेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येत आहेत.

३. उपरोक्त अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबित / प्रस्तावित असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार, त्यांच्याविरूध्द प्रलंबित / प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती त्यांना शिक्षा झाल्यास, सदर शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

४. उपरोक्त पदोन्नती, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र: २७९७/२०१५ मधील अंतिम निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

५. पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यांस पदस्थापना देण्यात यावी.

६. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांस, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७०६२३१८०२१८४७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2017.06.23 17:59:27 +05'30'

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

१. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
२. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/औरंगाबाद
९. संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत),
१०. निवडनस्ती / पोल-१(अ).